## प्रकरण - २
## मोठया शहरांतील गुन्हेगारी
## (पोलीस आयुक्तालये)

### प्रस्तावना

**२.१.१** महाराष्ट्रामध्ये एकूण ९ मोठी शहरे असून या शहरांमध्ये पोलीस आयुक्तालय पध्दती आहे. सन २००१ च्या जनगणनेच्या आधाराने सन २०१० ची या ९ मोठया शहरांची अंदाजित लोकसंख्या ३७५.४७ लाख आहे. सर्वात कमी लोकसंख्या ८.५६ लाख (अमरावती शहर) तर सर्वाधिक लोकसंख्या १४२.३९ लाख (मुंबई शहर) अशी आहे.

**२.१.२** २०१० ची अंदाजित लोकसंख्या २००१ च्या जनगणनेनुसार आहे. या सर्व ९ शहरांची मिळून लोकसंख्या महाराष्ट्र राज्याच्या एकूण लोकसंख्येच्या ३०.५६% आहे.

## CHAPTER – 2
## CRIME IN LARGE CITIES
## (POLICE COMMISSIONERATES)

### Preface

**2.1.1** There are 9 large cities in Maharashtra State which have Police Commissionerate system. As per 2001 census, estimated population of 2010 of these 9 large cities is 375.47 lakhs which is ranging from minimum 8.56 lakhs Amravati (C) to maximum 142.39 lakhs Mumbai (C).

**2.1.2** Population in the year 2010 is estimated on census figure of the year 2001. The population of these 9 large cities constitutes 30.56 percent of the State's total population.

**तक्ता क्र. २.१**
**मोठी शहरे व लोकसंख्या**
**Table No. 2.1**
**Large Cities & Population**

| Sr. No. | City | Estimated Mid-Year (2010) Population (in Lakhs) | Sr. No. | City | Estimated Mid-Year (2010) Population (in Lakhs) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 1 | 2 | 3 |
| 1 | A'bad (C) | 13.81 | 6 | Navi Mumbai (C) | 25.77 |
| 2 | Amravati (C) | 8.56 | 7 | Pune (C) | 57.21 |
| 3 | Mumbai (C) | 142.39 | 8 | Solapur (C) | 11.58 |
| 4 | Nagpur (C) | 26.39 | 9 | Thane (C) | 73.15 |
| 5 | Nasik (C) | 16.61 | | | |
| | Grand Total: Large Cities: 9 | | | | 375.47 |

### गुन्ह्यांचे विविध प्रकार

**२.२.१** मोठया शहरांतील गुन्हेगारीचे विश्लेषण हे भारतीय दंड विधान संहितेच्या २२ आणि विशेष व स्थानिक कायद्यांच्या २१ शीर्षकांखालील गुन्ह्यांबाबत मर्यादित आहे. प्रकरण १ मध्ये या ९ शहरांमध्ये वरील कायद्यानुसार दाखल होणाऱ्या गुन्ह्यांची सविस्तर माहिती जरूर त्या तक्त्यांमध्ये देण्यात आलेली आहे. गुन्हेगारीसंबंधी इतर तपशील म्हणजे विधी संघर्षग्रस्त बाल, सराईत गुन्हेगारी इत्यादी बाबतची माहिती सदर अहवालाच्या संबंधित प्रकरणात देण्यात आली आहे. तरी या शहरांतील गुन्हेगारीचा आराखडा, गुन्हेगारीचा कल या बाबतचे विश्लेषण सदर प्रकरणात सादर करण्यात आलेले आहे.

### भारतीय दंड विधान संहितेखालील अपराध

**२.३.१** सन २०१० सालात ९ शहरांमध्ये भारतीय दंड विधान संहितेच्या अंतर्गत विविध शीर्षकांखाली एकूण ८४२१७ दखलपात्र अपराधांची नोंद झालेली आहे. सन २००९ सालात ७९३८० या शहरातील दखलपात्र अपराधांशी तुलना करता २०१० सालात ६.०९% वाढ झाल्याचे दिसून येते. त्याप्रमाणे राज्यपातळीवरही दखलपात्र गुन्ह्यांमध्ये २००९ पेक्षा ४.३% ने वाढ झाली असल्याचे निदर्शनास येते. तक्ता क्र.२.२ मध्ये मोठ्या शहरांतील शीर्षकनिहाय दाखल गुन्ह्यांमध्ये सन २००९ च्या तुलनेत २०१० मध्ये झालेला प्रतिशत बदल आणि एकूण दाखल गुन्ह्यातील त्यांचा प्रतिशत हिस्सा दर्शविण्यात आला आहे.

### Various forms of crime.

**2.2.1** The present analysis vis a vis 9 Large Cities is restricted to 22 major specified crime heads under IPC and 21 specified crime heads under SLL. City-wise details are furnished along with relevant tables in Chapter 1. Other details vis a vis 'Juvenile in Conflict with Law', 'Recidivism' etc. are furnished in the respective chapters of the report. However, an analysis of the crime pattern and major trends in large cities is discussed in the forthcoming part of this chapter.

### Crimes under Indian Penal Code (IPC)

**2.3.1** A total of 84217 cognizable offences under the IPC were reported in the 9 Commrs. during 2010, as compared to 79380 offences in 2009 which shows an increase of 6.09%. At State level cognizable offences increased by 4.3% in 2010 as compared to 2009 . The crime head-wise percentage variation in 2010 over 2009 and percentage share to total crime in large cities is shown in the Table No.2.2.

**तक्ता क्र. २.२**

**सन २००९ व २०१० मध्ये मोठया शहरांतील गुन्हे, बदल व प्रतिशत हिस्सा**

**Table No. 2.2**

**Table showing incidences in 2009 and 2010 with percentage variation & percentage share in large cities**

| Sr. No. | Crime Head | Incidence | | Percent-age Share to Total | Percentage variation in 2010 over 2009 |
|---|---|---|---|---|---|
| | | 2009 | 2010 | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | MURDER | 710 | 715 | 0.85 | 0.70 |
| 2 | ATTEMPT TO MURDER | 586 | 596 | 0.71 | 1.71 |
| 3 | C.H. NOT AMOUNTING TO MURDER | 27 | 34 | 0.04 | 25.93 |
| 4 | RAPE | 464 | 548 | 0.65 | 18.10 |
| 5 | KIDNAPPING & ABDUCTION | 516 | 608 | 0.72 | 17.83 |
| | (I) OF WOMEN & GIRLS | 346 | 433 | 0.51 | 25.14 |
| | (II) OF OTHERS | 170 | 175 | 0.21 | 2.94 |
| 6 | DACOITY | 159 | 179 | 0.21 | 12.58 |
| 7 | PREP. & ASSEMBLY FOR DACOITY | 169 | 144 | 0.17 | -14.79 |
| 8 | ROBBERY | 1691 | 1769 | 2.10 | 4.61 |
| 9 | BURGLARY | 7708 | 7938 | 9.43 | 2.98 |
| 10 | THEFT | 27339 | 29073 | 34.52 | 6.34 |
| 11 | RIOTS | 1873 | 1791 | 2.13 | -4.38 |
| 12 | CRIMINAL BREACH OF TRUST | 973 | 956 | 1.14 | -1.75 |
| 13 | CHEATING | 4674 | 4919 | 5.84 | 5.24 |
| 14 | COUNTERFEITING | 275 | 210 | 0.25 | -23.64 |
| 15 | ARSON | 105 | 139 | 0.17 | 32.38 |
| 16 | HURT/GRIEVOUS HURT | 8712 | 9628 | 11.43 | 10.51 |
| 17 | DOWRY DEATHS | 57 | 62 | 0.07 | 8.77 |
| 18 | MOLESTATION | 892 | 1000 | 1.19 | 12.11 |
| 19 | SEXUAL HARASSMENT | 371 | 418 | 0.50 | 12.67 |
| 20 | CRUELTY BY HUSBAND OR RELATIVES | 1829 | 1610 | 1.91 | -11.97 |
| 21 | IMPORTATION OF GIRLS | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 22 | DEATH DUE TO RASH & NEGLI. ACT | 2931 | 2970 | 3.53 | 1.33 |
| 23 | OTHER IPC CRIMES | 17319 | 18910 | 22.45 | 9.19 |
| **TOTAL COGNIZABLE CRIMES UNDER IPC** | | **79380** | **84217** | **100.00** | **6.09** |

**२.३.२** सन २०१० मध्ये ९ मोठया शहरातील गुन्ह्यांवर दृष्टिक्षेप टाकता जाळपोळ (३२.३८%), सदोष मनुष्यवध (२५.९३%), बलात्कार (१८.१%), अपहरण व पळवून नेणे (१७.८३%), छेडछाड (१२.६७%), दरोडा (१२.५८%), विनयभंग (१२.११%) या शीर्षकांखालील गुन्ह्यांमध्ये भरीव वाढ झालेली असून, बनावट चलन (२३.६४%), दरोड्याची तयारी (१४.७९%), पती व पतीच्या नातेवाईकांकडून छळ (११.९७ %) या शीर्षकांखालील गुन्ह्यांमध्ये घट झालेली आहे. या ९ मोठया शहरांतील एकूण दखलपात्र गुन्ह्यांमध्ये (६.०९%) ने वाढ झालेली दिसून येते.

**2.3.2** In 2010 there was an increase under the crime head of Arson (32.38%) C.h. Not Amounting To Murder (25.93%), Rape (18.1%) Kidnapping & Abduction (17.83%), Sexual Harassment (12.67%), Dacoity (12.58%), Molestation (12.11%) and a decrease under crime heads, Counterfeiting (23.64%), Prep. & Assembly For Dacoity (14.79%), cruelty by Husband or Relatives (11.97%). There was an overall increase in total cognizable crime in 9 cities (6.09%).

**आलेख क्र. २.१**

**सन २०१० मध्ये भा.दं.वि. शीर्षकांखालील गुन्हयांचे ९ शहरांतील प्रतिशत प्रमाण**

**Chart No. 2.1**

**IPC Crime in 9 Police Commissionerates in 2010**

**(Percentage-wise)**




**२.३.३** ९ शहरातील एकुण दाखल गुन्ह्यांमध्ये मुंबई शहर दाखल झालेल्या गुन्हयांचा वाटा सर्वात जास्त (४०.२९% ) असून त्याखालोखाल पुणे शहर (१६.१५%), ठाणे शहर (११.८१%), नागपूर शहर (९.१८%), नवी मुंबई (६.९७%), नाशिक शहर (५.३२%), औरंगाबाद शहर (४.६९%), अमरावती शहर (३.६६%) व सोलापूर शहर (१.९३%) असा गुन्ह्यांचा हिस्सा दिसून येतो.

**2.3.3.** Mumbai (C) has the largest share (40.29%) of total crime registered in 9 large cities followed by Pune (C) (16.15%), Thane (C) (11.81%), Nagpur (C) (9.18%), Navi Mumbai (C) (6.97%), Nasik (C) (5.32%), A'bad (C) (4.69%), Amravati (C) (3.66%) and Solapur (C) (1.93%)

## गुन्ह्यांचे प्रमाण (भा.दं.वि.)

**२.४.१** गुन्ह्यांचे प्रमाण म्हणजे दर एक लाख लोकसंख्येमागे दाखल होणारे गुन्हे. शहरातील गुन्हयांचे प्रमाण व राज्यातील गुन्ह्यांचे प्रमाण यांचा तौलनिक अभ्यास तक्ता क्र. २.३ मध्ये करण्यात आला आहे.

## Rate of Crime (IPC)

**2.4.1** The rate of crime i.e. incidences per lakh of population. The comparative study of crime rate in each city with that of Maharashtra State is presented in Table No.2.3.

**तक्ता क्र.२.३**

**मोठी शहरे व राज्यात दाखल गुन्ह्यांचे (भादंवि) तुलनात्मक प्रमाण**

**Table No. 2.3**

**Comparative rate of crime (IPC) in large cities & State**

**(Per 1 Lakh Population )**

| Sr. No. | City | Rate of Crime (IPC) Per Lakh Pop. | |
|---|---|---|---|
| | | City | State of Maharashtra |
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | Amravati (C) | 359.7 | 169.4 |
| 2 | Nagpur (C) | 292.8 | |
| 3 | A'bad (C) | 286.2 | |
| 4 | Nasik (C) | 270.0 | |
| 5 | Mumbai (C) | 238.3 | |
| 6 | Pune (C) | 237.8 | |
| 7 | Navi Mumbai (C) | 227.9 | |
| 8 | Solapur (C) | 140.2 | |
| 9 | Thane (C) | 135.9 | |
| | **Total of Nine cities:** | **224.3** | |

**२.४.२** वरील तक्त्याचे अवलोकन करता सर्वसाधारणतः भारतीय दंड विधान संहितेखाली राज्यात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाणापेक्षा शहरात दाखल होणाऱ्या गुन्ह्यांचे प्रमाण जास्त असल्याचे आढळून येईल. अमरावती शहर (३५९.७), नागपूर शहर (२९२.८), औरंगाबाद शहर (२८६.२), नाशिक शहर (२७०), मुंबई शहर (२३८.३), पुणे शहर (२३७.८), नवी मुंबई (२२७.९) या शहरांतील गुन्ह्यांचे प्रमाण राज्याचे गुन्ह्यांचे प्रमाणापेक्षा (१६९.४) जास्त असल्याचे दिसून येते. याला अपवाद सोलापूर शहर व ठाणे शहर असून तेथे दाखल गुन्ह्यांचे प्रमाण अनुक्रमे १४०.२ व १३५.९ असे आहे.

**2.4.2** From this table it may be observed that comparative crime rate under I.P.C. in cities is generally higher than that of Maharashtra State. The crime rate in Amravati (C) (359.7), Nagpur (C) (292.8), A'bad (C) (286.2), Nasik (C) (270),Mumbai (C) (238.3),Pune (C) (237.8),Navi Mumbai (C) (227.9) is more than the crime rate of the State (169.4) except Solapur (C) and Thane (C). Crime rate in Solapur (C) and Thane (C) is lower as 140.2 and 135.9 than that of the State respectively.

**मोठया शहरांतील गुन्हेगारीचा साचा**

**२.५.१** राज्यातील भा.दं.वि. प्रमाणे दाखल एकूण गुन्ह्यांपैकी शहरातील गुन्ह्यांचा वाटा ४०.४६% आहे. ९ शहरांची लोकसंख्या राज्याच्या लोकसंख्येच्या(३०.५६%) इतकी आहे.

**Crime pattern in Large cities.**

**2.5.1** The proportion of total registered crime under I.P.C. in 9 big cities is 40.46% as compared to the state's total registered I.P.C. Crimes, with proportion of population of large Cities to the State's population which is 30.56%.

## आलेख क्र. २.२
## सन २०१० मधील राज्यातील शहरांच्या निरनिराळया गुन्ह्यांची टक्केवारी दर्शविणारा आलेख
## Chart No. 2.2
## Percentage share of cities towards various Offences in the State during -2010




### खून, खुनाचा प्रयत्न आणि सदोष मनुष्यवध

**२.५.२** सन २०१० सालात महाराष्ट्र राज्यात खुनांचे २७४४ गुन्हे दाखल झालेले असून त्यापैकी ७१५ गुन्हे ९ शहरांत दाखल झालेले आहेत. राज्यात दाखल खुनांच्या गुन्हयात त्यांचा वाटा २६.०६% इतका आहे. एकूण ९ शहरांत दाखल झालेल्या खुनांच्या गुन्हयांपैकी सर्वाधिक ३१.८९% गुन्हे मुंबई शहर दाखल झालेले आहेत.

**२.५.३** सन २०१० सालात ९ शहरांमध्ये खुनाचा प्रयत्न या सदराखाली एकूण ५९६ गुन्हे दाखल असून २००९ सालात या सदराखाली ५८६ गुन्ह्यांची नोंद झालेली होती. खुनाचा प्रयत्न या शीर्षकाखाली एकुण १.७१% वाढ झाल्याचे दिसून येते.

### Murder, its attempt and culpable homicide not amounting to Murder.

**2.5.2** In 2010, 2744 Murder cases were reported in the State. The 9 cities together contributed 715 ( 26.06%). Mumbai (C) registered the highest number of Murders i.e. 31.89% of the total Murders registered in the Cities.

**2.5.3** In 2010, 596 cases of Attempt to commit Murder were reported in 9 cities as against 586 cases in 2009 which shows an increase of 1.71%.

तक्ता क्र. २.४

सन २०१० मध्ये राज्य व आयुक्तालयातील भादंवि अंतर्गत दाखल गुन्हे व प्रतिशत हिस्सा

Table No. 2.4

Incidence of crimes reported under IPC in State & Commissionerates during 2010 with Percentage Share of Cities ( Commissionerates )

| SR. NO. | CRIME HEAD | MAHARASHTRA STATE | CITIES | SHARE OF CITIES TO STATE |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | MURDER | 2744 | 715 | 26.06 |
| 2 | ATTEMPT TO MURDER | 1926 | 596 | 30.94 |
| 3 | C.H. NOT AMOUNTING TO MURDER | 152 | 34 | 22.37 |
| 4 | RAPE | 1599 | 548 | 34.27 |
| 5 | KIDNAPPING & ABDUCTION | 1508 | 608 | 40.32 |
| | (I) OF WOMEN & GIRLS | 1124 | 433 | 38.52 |
| | (II) OF OTHERS | 384 | 175 | 45.57 |
| 6 | DACOITY | 778 | 179 | 23.01 |
| 7 | PREP. & ASSEMBLY FOR DACOITY | 285 | 144 | 50.53 |
| 8 | ROBBERY | 3721 | 1769 | 47.54 |
| 9 | BURGLARY | 16617 | 7938 | 47.77 |
| 10 | THEFT | 52565 | 29073 | 55.31 |
| 11 | RIOTS | 8412 | 1791 | 21.29 |
| 12 | CRIMINAL BREACH OF TRUST | 1948 | 956 | 49.08 |
| 13 | CHEATING | 8684 | 4919 | 56.64 |
| 14 | COUNTERFEITING | 389 | 210 | 53.98 |
| 15 | ARSON | 1229 | 139 | 11.31 |
| 16 | HURT/GRIEVOUS HURT | 29696 | 9628 | 32.42 |
| 17 | DOWRY DEATHS | 393 | 62 | 15.78 |
| 18 | MOLESTATION | 3661 | 1000 | 27.31 |
| 19 | SEXUAL HARASSMENT | 1180 | 418 | 35.42 |
| 20 | CRUELTY BY HUSBAND OR RELATIVES | 7434 | 1610 | 21.66 |
| 21 | IMPORTATION OF GIRLS | 0 | 0 | 0.00 |
| 22 | DEATH DUE TO RASH & NEGLI. ACT | 13508 | 2970 | 21.99 |
| 23 | OTHER IPC CRIMES | 49739 | 18910 | 38.02 |
| TOTAL COGIZABLE CRIMES UNDER IPC | | **208168** | **84217** | **40.46** |

**सदोष मनुष्यवध**

**२.५.४** महाराष्ट्र राज्यात सदोष मनुष्यवध या गुन्हे शीर्षकाखाली दाखल गुन्ह्यांमध्ये ९ शहरांचा २२.३७% इतका वाटा आहे. ९ शहरांमध्ये या सदराखालील दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी मुंबई शहर (२०.५९%) व पुणे शहर (१७.६५%) इतका वाटा आहे.

**Culpable Homicide not amounting to Murder**

**2.5.4** The 9 Cities contributed for 22.37% cases of C.H.not amounting to Murder reported in the State. Mumbai (C) accounts for 20.59% and Pune (C) 17.65% of C.H.not amounting to murder.

**पळवून नेणे व अपहरण**

**२.५.५** या गुन्हे शीर्षकाखालील ९ शहरांमध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये सन २००९ पेक्षा सन २०१० मध्ये १७.८३% गुन्ह्यांची वाढ झालेली आहे. सन २०१० मध्ये राज्यात दाखल झालेल्या गुन्ह्यांमध्ये ९ शहरांमधील दाखल गुन्ह्यांचा वाटा ४०.३२% इतका आहे.

**Kidnapping & Abduction**

**2.5.5** An increase of 17.83% in the crime under this head is noted in the year 2010 as compared to that of 2009. The cities accounted for 40.32% of all cases registered in the State during 2010.

## बलात्कार

**२.५.६** सन २००९ (४६४) तर सन २०१० (५४८) मध्ये या सदराखाली ९ आयुक्तालयांमधील गुन्ह्यात ८४ (१८.१%) ने वाढ झालेली आहे. मुंबई शहर सर्वात जास्त १९४ (३५.४%) गुन्हे दाखल आहेत.

**२.५.७** बलात्कार या गुन्हे शीर्षकाखाली राज्यातील एकूण १५९९ गुन्ह्यांमध्ये ९ शहरांचा वाटा ५४८ (३४.२७%) आहे.

**२.५.८** शहरातील बलात्कारांच्या गुन्ह्यांची आकडेवारी पाहता १० वर्षापेक्षा लहान वयोगटातील बलात्काराचे बळी ४४ (७.९%) असून, १० ते १४ वर्षे वयोगटातील बळींचे प्रमाण ४४ (७.९%) असे आहे. १४ ते १८ वयोगटातील बळींचे सर्वात जास्त प्रमाण २४६ (४४.१७%) आहे. १८ ते ३० वयोगटातील बळींचे प्रमाण १७८ (३१.९६%) आहे. ३० ते ५० या वयोगटातील बळींचे प्रमाण ४१ (७.३६%) असे आहे. ५० वर्षावरील वयोगटात बळींची संख्या ४ (०.७२%) इतकी आहे.

## Rape

**2.5.6** The number of cases reported (548) in the 9 Commissionerates in 2010 , increase by 84 (18.1%) as compared to the previous year 2009 (464). Mumbai (C) reported the highest number of incidences i.e. 194 ( 35.4%).

**2.5.7** Out of 1599 Rape cases reported in the State, the 9 cities have their share of 548 cases (34.27%).

**2.5.8** Age group wise analysis of rape victims in large cities shows that 44 (7.9%) victims were below 10 years of age, 44(7.9%) in the age group of 10 to 14 years. The highest share of rape victims was in the age group of 14 to 18 years which comprises 246 (44.17%). 178 (31.96 %) in the age group of 18 to 30 years. 41 (7.36%) victims were between 30 to 50 years. 4 (0.72%) victims were above age group of 50 years.

**तक्ता क्र. २.५**

**मोठ्या शहरांतील बलात्काराचे बळी २०१०**

**Table No. 2.5**

**Victims of Rape in Large Cities - 2010**

| Sr. No. | Type of Place | Total Victims | Age Group-wise Rape Victims | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | Below 10 Years | 10-14 Years | 14-18 Years | 18-30 Years | 30-50 Years | Above 50 Years |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1 | CITIES | 557 | 44 (7.9%) | 44 (7.9%) | 246 (44.17%) | 178 (31.96%) | 41 (7.36%) | 4 (0.72%) |
| 2 | STATE | 1611 | 108 (6.7%) | 134 (8.32%) | 515 (31.97%) | 675 (41.9%) | 168 (10.43%) | 11 (0.68%) |

Note : Bracketed figures represent the percentage share of victims in the tabulated age group in the total victims .

## दरोडा

**२.५.९** ९ शहरांमध्ये २०१० मध्ये १७९ गुन्हे दाखल झाले. २००९ पेक्षा (१५९) १२.५८% ने वाढ झाली. राज्यातील एकूण (७७८) दरोड्यांपैकी २३.०१% गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झाले आहेत.

## Dacoity

**2.5.9** There were 179 cases reported under this head in 2010 as against 159 in 2009 which shows an increase of 12.58%. Out of (778) total dacoities registered in the State, 23.01% were registered in the 9 cities.

## जबरी चोरी

**२.५.१०** सन २०१० मध्ये राज्यात या सदराखाली दाखल झालेल्या एकुण गुन्ह्यांपैकी ४७.५४ % गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल असून सन २००९ शी तुलना करता ४.६१% ने वाढ झाल्याचे आढळून येते. सर्व शहरांमध्ये सर्वात जास्त ४५२ (२५.५५%) गुन्ह्यांची नोंद पुणे शहरात झालेली आहे. त्या खालोखाल मुंबई शहर ४१० (२३.१८%), नागपूर शहर २५९ (१४.६४%), ठाणे शहर १७२ (९.७२%), अशी जबरी चोरीच्या गुन्ह्यांची नोंद झालेली आहे.

## Robbery

**2.5.10** In 2010, 9 cities contributed 47.54 % of all robberies reported in the State, an increase of 4.61% over the previous year 2009. Pune (C) reported the highest robberies i.e. 452 (25.55%) followed by Mumbai (C) 410 (23.18%), Nagpur (C) 259 (14.64%) and Thane (C) 172 (9.72%).

## घरफोडी चोरी

**२.५.११** सन २०१० सालात राज्यात या सदराखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी ४७.७७% गुन्हे ९ शहरांमध्ये नोंद झालेले आहेत. शहरांमध्ये एकूण ७९३८ गुन्ह्यांची नोंद झालेली असून सन २००९ पेक्षा २.९८% ने वाढ झाली आहे. घरफोडी चोरीचे सर्वात जास्त गुन्हे मुंबई शहर (३०५९) दाखल असून त्यांची टक्केवारी ३८.५४% इतकी आहे त्याखालोखाल पुणे शहर (१२५०) १५.७५%, ठाणे शहर (१०८०) १३.६१ % व नवी मुंबई (७००) ८.८२%. याप्रमाणे सन २०१० सालात गुन्हयांची नोंद झालेली आहे.

## Burglary

**2.5.11** Burglaries in the 9 cities contributed 47.77% of all such cases (7938) reported in the State, in 2010 and show increase of 2.98% over 2009. The maximum number of burglaries were reported in Mumbai (C) (3059) 38.54% followed by Pune (C) (1250) 15.75%, Thane (C) (1080) 13.61%, and Navi Mumbai (C) (700) 8.82%.

## चोरी

**२.५.१२** सन २०१० मध्ये चोरी या सदराखालील गुन्ह्यांमध्ये २००९ सालाशी तुलना करता या ९ शहरांमध्ये ६.३४% ने वाढ झालेली असून राज्यात दाखल झालेल्या चोरीच्या गुन्ह्यांपैकी २९०७३ (५५.३१%) गुन्हे या ९ शहरांमध्ये नोंद झालेले आहेत. ९ शहरांमध्ये दाखल झालेल्या चोरीच्या गुन्ह्यांपैकी सर्वात जास्त (१३१९५) ४५.३९% गुन्हे एकट्या मुंबई शहर दाखल असून त्याखालोखाल पुणे शहर (४६७४) १६.०८%, ठाणे शहर (३१७३) १०.९१% या शहरांमध्ये चोरीचे गुन्हे दाखल झालेले आहेत.

## Theft

**2.5.12** In 2010 Theft cases in 9 Cities increased by 6.34% as compared to 2009. 29073 theft cases have been reported in 9 large cities which contributed 55.31% of all total theft cases reported in the State. Mumbai (C) has the largest share of thefts 13195 which is reported in 9 Cities (45.39%) followed by Pune (C) 4674 (16.08%) and Thane (C) 3173 (10.91%).

## गर्दी मारामारी

**२.५.१३** सन २०१० सालात राज्यात या सदराखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी २१.२९% गुन्ह्यांची नोंद ९ शहरांत झाल्याचे दिसून येते. दाखल गुन्ह्यांची आकडेवारी पाहता पुणे शहराचा प्रथम क्रमांक लागतो. ९ शहरात गर्दी मारामारीच्या एकूण दाखल गुन्ह्यांपैकी सर्वात जास्त (३९३) २१.९४% गुन्हे पुणे शहर येथे दाखल झालेले आहेत. गर्दी मारामारीच्या घटनांचे अवलोकन करता मुंबई शहर (३९१), ठाणे शहर (२८५), नागपूर शहर (१८३), नाशिक शहर (१४६), औरंगाबाद शहर (१३८), नवी मुंबई (१३५), सोलापूर शहर (६५) व अमरावती शहर (५५) असे गुन्हे दाखल आहेत.

## Riots

**2.5.13** The 9 cities accounted for 21.29% of all the riots cases reported in the State in 2010. Pune (C) recorded the highest incidence 393 (21.94%) of these cases, followed by Mumbai (C) (391), Thane (C) (285), Nagpur (C) (183), Nasik (C) (146), A'bad (C) (138), Navi Mumbai (C) (135), Solapur (C) (65) & Amravati (C) (55).

**आर्थिक गुन्हेगारी**

**२.५.१४** आर्थिक गुन्हेगारीचा अभ्यास करताना अन्यायाने विश्वासघात, फसवणूक आणि नकली नाणी, नोटा या संदर्भात दाखल गुन्ह्यांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. ९ शहरांमध्ये या सदराखाली दाखल गुन्ह्यांपैकी ९५६ गुन्हे अन्यायाने विश्वासघात करणे (४९.०८%), ४९१९ फसवणूकीचे (५६.६४%) आणि २१० गुन्हे नकली नाणी व नोटा (५३.९८%) या ९ शहरांमध्ये नोंद झालेले आहेत. या ९ शहरांतील वरील तीन सदराखालील गुन्हयांपैकी मुंबई शहरांत अन्यायाने विश्वासघात करणे (५०.४२ %), फसवणूक करणे (४४.९५%) आणि नकली नाणी व नोटा संबंधी गुन्हे (३६.१९%) गुन्हे दाखल असल्याचे दिसून येते.

**Economic crimes**

**2.5.14** While studying Economic Crimes we have to consider the crimes reported under Criminal Breach of Trust, Cheating and Counterfeiting in 2010. The 9 large cities accounted for 956 Criminal Breach of Trust cases (49.08%), 4919 of Cheating cases (56.64%) and 210 of Counterfeiting cases (53.98%). Mumbai (C) accounted for (50.42%) of Criminal Breach of Trust cases, (44.95%) of Cheating cases and (36.19%) of Counterfeiting cases.

**जाळपोळ**

**२.५.१५** या सदराखाली महाराष्ट्र राज्यात दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी फक्त ११.३१% गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. ९ शहरात दाखल गुन्ह्यांपैकी ठाणे शहर (२२), मुंबई शहर (२२), नागपूर शहर (२०), नाशिक शहर (१७), पुणे शहर (१७), अमरावती शहर (१६), औरंगाबाद शहर (१५), नवी मुंबई (६) व सोलापूर शहर (४) असे गुन्हे दाखल झालेले आहेत.

**Arson**

**2.5.15** The 9 cities contributed only 11.31% of the total number of Arson cases reported in the State during 2010. The number of crimes registered were, Thane (C) (22), Mumbai (C) (22), Nagpur (C) (20), Nasik (C) (17), Pune (C) (17), Amravati (C) (16), A'bad (C) (15), Navi Mumbai (C) (6) & Solapur (C) (4).

**दुखापत**

**२.५.१६** सन २०१० सालात राज्यात या सदराखाली दाखल गुन्ह्यांपैकी ९६२८ (३२.४२%) गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. प्रामुख्याने मुंबई शहर (४४८७), ठाणे शहर (१३२२), पुणे शहर (११६९) व नागपूर शहर (८४२) या शहरांमध्ये दुखापतीचे जास्त गुन्हे नोंद झालेले आहेत. २००९ मधील दाखल गुन्ह्यांच्या तुलनेत २०१० मध्ये १०.५१% ने वाढ झालेली आहे.

**Hurt**

**2.5.16** The 9 cities contributed, 9628 i.e. (32.42%) of all the cases of Hurt reported in the State during 2010 . Mumbai (C) (4487), Thane (C) (1322), Pune (C) (1169) and Nagpur (C) (842), accounted for the major proportion of such cases among the 9 cities. The number of hurt cases reported in the 9 cities in 2010 have increased by 10.51% as compared to 2009 .

**हुंडाबळी**

**२.५.१७** महाराष्ट्र राज्यात सन २०१० सालात या सदराखाली दाखल गुन्ह्यांपैकी १५.७८% गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. ९ शहरातील एकूण गुन्हयापैकी ५०% वाटा मुंबई शहर व औरंगाबाद शहराचा आहे. ९ शहरांमध्ये २००९ मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांच्या तुलनेत सन २०१० साली ५ गुन्हयांनी वाढ झाल्याचे दिसून येते.

**Dowry Death**

**2.5.17** Dowry Death cases reported in the 9 cities accounted for 15.78% of all such cases reported in the State during 2010. Mumbai (C) and A'bad (C) account for 50% of all such cases reported in the cities. There was an increase by 5 cases reported in the cities in 2010, as compared to 2009.

**विनयभंग**

**२.५.१८** विनयभंग या सदराखाली राज्यात दाखल गुन्ह्यांपैकी २७.३१% गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. सन २००९ पेक्षा सन २०१० मध्ये १२.११% इतकी वाढ झालेली आहे. मुंबई शहर (४७५), ठाणे शहर (१५२), नागपूर शहर (८७), पुणे शहर (७८) आणि अमरावती शहर (५२) या ५ शहरांमध्ये या सदराखाली गुन्हे दाखल होण्याचे प्रमाण जास्त असून ९ शहरातील या सदराखालील दाखल गुन्ह्यांपैकी ८४.४% गुन्हे वरील ५ शहरांमध्ये नोंद झालेले आहेत.

**Molestation**

**2.5.18** The number of cases of molestation reported in the cities accounted for 27.31% of all such cases registered in the State . During 2010 the incidences have increased by 12.11% over 2009. Cities like Mumbai (C) (475), Thane (C) (152), Nagpur (C) (87), Pune (C) (78) and Amravati (C) (52) have a larger share of molestation cases. These five cities accounted for 84.4 % of the total cases reported in the 9 Cities.

**छेडछाड**

**२.५.१९** या सदराखाली महाराष्ट्र राज्यात दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी ३५.४२% गुन्हे या ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. २०१० मध्ये १२.६७% नी या गुन्ह्यात वाढ झालेली आहे. ९ शहरांपैकी सर्वात जास्त मुंबई शहर (१३८), त्याखालोखाल पुणे शहर (९१), नागपूर शहर (४८) आणि औरंगाबाद शहर (३९) या शहरांचा क्रम लागतो.

**Eve Teasing (Sexual Harassment)**

**2.5.19** The number of cases of Eve Teasing (sexual harassment) reported in 9 cities as a proportion of the total cases reported in the State was 35.42% in 2010. The number of cases have increased by 12.67% over 2009. Mumbai (C) recorded the highest incidents (138) followed by Pune (C) (91), Nagpur (C) (48) and A'bad (C) (39).

**पती किंवा त्याचे नातेवाईकांकडून छळ**

**२.५.२०** सन २०१० मध्ये राज्यात विवाहित स्त्रियांवरील तिचा पती किंवा त्याचे नातेवाईकाकडून छळाबाबत दाखल गुन्ह्यांपैकी २१.६६% गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. ठाणे शहर (३६५), मुंबई शहर (३१२), पुणे शहर (२१४), नागपूर शहर (१७५) या चार शहरांत या सदराखाली जास्त गुन्हे दाखल असून ९ शहरांत या सदराखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी ६६.२१% गुन्हे या चार शहरात नोंद झालेले आहेत.

**Cruelty by Husband or his relatives**

**2.5.20** The number of cases of cruelty to married women by her husband or his relatives reported in the 9 cities accounted for 21.66% of all such cases reported during 2010. The incidence of such cases were higher in Thane (C) (365), Mumbai (C) (312), Pune (C) (214) and Nagpur (C) (175). These four cities accounted for 66.21% of all such cases reported in the 9 cities.

**अनैतिक संबंधासाठी मुलींची आयात करणे**

**२.५.२१** या सदराखाली राज्यात एकही गुन्हा दाखल नाही.

**Importation of Girls**

**2.5.21** There is no case registered under this head in the State.

**निष्काळजीपणामुळे मृत्यूस कारणीभूत होणे.**

**२.५.२२** या सदराखाली राज्यात १३५०८ गुन्हे दाखल असून मोठया शहरांतील गुन्हयांचा वाटा २९७० म्हणजे राज्याच्या गुन्ह्यांच्या तुलनेत (२१.९९%) आहे. मुंबई शहरात सर्वात जास्त गुन्हे (६९०) दाखल आहेत. त्याखालोखाल पुणे शहर (६२०), नवी मुंबई (४३२), ठाणे शहर (३४३), नागपूर शहर (३३२) व अमरावती शहर सर्वात कमी (६८) गुन्हे दाखल झालेले आहेत.

**Causing Death by negligence**

**2.5.22** Under this head 13508 cases were registered in the State in 2010 in which share of large cities is (2970) i.e. 21.99%. Mumbai (C) shows highest number of cases (690) followed by Pune (C) (620), Navi Mumbai (C) (432), Thane (C) (343), Nagpur (C) (332) & Amravati (C) shows lowest (68) cases.

**विशेष आणि स्थानिक कायदयांखालील गुन्हे**

**२.६.१** विशेष आणि स्थानिक कायद्यांतर्गत ९ मोठया शहरांमध्ये सन २००९ मध्ये दाखल झालेल्या गुन्ह्यांची व सन २०१० मधील दाखल गुन्ह्यांची शीर्षकनिहाय तुलनात्मक माहिती तक्ता क्र. २.६ मध्ये दर्शविण्यात आली आहे.

**२.६.२** विशेष आणि स्थानिक कायद्यान्वये या ९ शहरांमध्ये सन २००९ मध्ये ५२४५५ गुन्ह्यांची नोंद झालेली असून सन २०१० मध्ये ४६०१२ गुन्हे दाखल झालेले आहेत. या सदराखाली सर्वात जास्त गुन्हे नागपूर शहर २५५२१ आणि सर्वात कमी गुन्हे नाशिक शहर (६४८) असे दाखल आहेत. इतर शहरांशी तुलना करता नागपूर शहर दाखल गुन्ह्यांमध्ये सर्वात जास्त गुन्हे दारुबंदी या शीर्षकाखाली दाखल आहेत. विशेष आणि स्थानिक कायद्यान्वये सन २०१० मधे दाखल गुन्ह्यांची राज्यातील दाखल गुन्हयांशी तुलना करता ९ शहरांत ३५.९६% गुन्हे दाखल आहेत.

**Crimes under Special and Local Laws**

**2.6.1** The comparative figures of cases reported under S.S.L. Acts in 2009 & 2010 in the 9 large cities are shown in chart No.2.6.

**2.6.2** The 9 cities have reported 52455 cases under Special & Local Laws during 2009 as compared to 46012 cases during 2010 . During 2010 highest number of cases under S.L.L were reported in Nagpur (C) (25521) and lowest in Nasik (C) 648. In Nagpur (C) cases under the head Prohibition Act are the highest as compared to other Cities. The 9 cities accounted for 35.96 % cases under S.L.L in 2010 as compared to that of the State.

**२.६.३** सन २०१० सालात विशेष व स्थानिक कायद्याखाली येणारे (इतर) गुन्हे, भारतीय पारपत्र कायदा, दारूबंदी कायदा, परकीय नागरीक नोंदणी कायदा , मादक औषधे व अंमली पदार्थाचा कायदा या शीर्षकांखाली दाखल झालेल्या गुन्ह्यात सन २००९ च्या तुलनेत घट झालेली दिसून येते. तर अनुसूचित जाती /जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा, अत्यावश्यक वस्तूंसंबंधीचा कायदा, बौद्धिक संपदा हक्क कायदा, अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा यामध्ये वाढ झाल्याचे दिसून येते.

**2.6.3** In 2010 a decreasing trend is seen in cases under Other SLL Crimes , Indian Passport Act, Prohibition Act, Registration Of Foreigners Act, N.D.P.S. Act. But there is an increase in cases of SC/ST ( Prevention of Atrocities ) Act, Essential Commodities Act, Copyright Act, Immoral Traffic [Prevention] Act.

**तक्ता क्र. २.६**

**सन २००९ व २०१० मध्ये विशेष व स्थानिक कायद्याखाली दाखल गुन्हे**

**Table No. 2.6**

**Incidence of cases under SLL during 2009 & 2010**

| SR. NO. | CRIME HEAD | INCIDENCE | | Percentage Share to Total | Percentage variation in 2010 over 2009 |
|---|---|---|---|---|---|
| | | 2009 | 2010 | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 1 | ARMS ACT | 752 | 678 | 1.47 | -9.84 |
| 2 | N.D.P.S. ACT | 1246 | 870 | 1.89 | -30.18 |
| 3 | GAMBLING ACT | 2009 | 1977 | 4.30 | -1.59 |
| 4 | EXCISE ACT | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 5 | PROHIBITION ACT | 9751 | 7595 | 16.51 | -22.11 |
| 6 | EXPLOSIVES & EXPLOSIVE SUBSTANCES ACT | 5 | 2 | 0.00 | -60.00 |
| 7 | IMMORAL TRAFFIC [PREVENTION] ACT | 226 | 232 | 0.50 | 2.65 |
| 8 | INDIAN RAILWAYS ACT | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 9 | REGISTRATION OF FOREIGNERS ACT | 22 | 16 | 0.03 | -27.27 |
| 10 | PROTECTION OF CIVIL RIGHTS ACT | 2 | 2 | 0.00 | 0.00 |
| 11 | INDIAN PASSPORT ACT | 71 | 60 | 0.13 | -15.49 |
| 12 | ESSENTIAL COMMODITIES ACT | 539 | 562 | 1.22 | 4.27 |
| 13 | T.A.D.A. | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 14 | ANTIQUITY & ART TREASURE ACT | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 15 | DOWRY PROHIBITION ACT | 8 | 8 | 0.02 | 0.00 |
| 16 | CHILD MARRIAGE RESTRAIN ACT | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 17 | INDECENT REPRESENTATION OF WOMEN [P] ACT | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 18 | COPYRIGHT ACT | 426 | 440 | 0.96 | 3.29 |
| 19 | SATI PREVENTION ACT | 0 | 0 | 0.00 | 0.00 |
| 20 | SC/ST [PREVENTION OF ATROCITIES] ACT | 42 | 68 | 0.15 | 61.90 |
| 21 | FOREST ACT | 2 | 2 | 0.00 | 0.00 |
| 22 | OTHER SLL CRIMES | 37354 | 33500 | 72.81 | -10.32 |
| **TOTAL COGNIZABLE CRIMES UNDER SLL** | | **52455** | **46012** | **100.00** | **-12.28** |

**२.६.४** सन २०१० मधील विशेष व स्थानिक कायद्यांतर्गत दाखल निरनिराळया गुन्ह्यांचा शीर्षकनिहाय ९ शहरांचा राज्यापैकी वाटा तक्ता क्रमांक २.७ मध्ये दर्शविला आहे.

**2.6.4** The percentage share of 9 large cities with that of the State under S.L.L cases (Crime Head Wise) in 2010 is presented in Table 2.7.

तक्ता क्र. २.७

सन २०१० मध्ये विशेष व स्थानिक कायद्याखाली दाखल गुन्हे

**Table No. 2.7**

**Cases under S.L.L. in the State and Commissionarates with Percentage share of cities during - 2010**

| Sr. No. | CRIME HEAD | Maharashtra State | Cities | % Share of Cities to Maharashtra |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | ARMS ACT | 1068 | 678 | 63.48 |
| 2 | N.D.P.S. ACT | 1081 | 870 | 80.48 |
| 3 | GAMBLING ACT | 11986 | 1977 | 16.49 |
| 4 | EXCISE ACT | 0 | 0 | 0.00 |
| 5 | PROHIBITION ACT | 67932 | 7595 | 11.18 |
| 6 | EXPLOSIVES & EXPLOSIVE SUB. ACT | 51 | 2 | 3.92 |
| 7 | IMMORAL TRAFFIC [PREVENTION] ACT | 306 | 232 | 75.82 |
| 8 | INDIAN RAILWAYS ACT | 35 | 0 | 0.00 |
| 9 | REGISTRATION OF FOREIGNERS ACT | 16 | 16 | 100.00 |
| 10 | PROTECTION OF CIVIL RIGHTS ACT | 25 | 2 | 8.00 |
| 11 | INDIAN PASSPORT ACT | 69 | 60 | 86.96 |
| 12 | ESSENTIAL COMMODITIES ACT | 1897 | 562 | 29.63 |
| 13 | T.A.D.A. | 0 | 0 | 0.00 |
| 14 | ANTIQUITY & ART TREASURE ACT | 0 | 0 | 0.00 |
| 15 | DOWRY PROHIBITION ACT | 40 | 8 | 20.00 |
| 16 | CHILD MARRIAGE RESTRAINT ACT | 4 | 0 | 0.00 |
| 17 | INDECENT REPRE. OF WOMEN [P] ACT | 0 | 0 | 0.00 |
| 18 | COPYRIGHT ACT | 662 | 440 | 66.47 |
| 19 | SATI PREVENTION ACT | 0 | 0 | 0.00 |
| 20 | SC/ST [PREVE. OF ATROCITIES] ACT | 374 | 68 | 18.18 |
| 21 | FOREST ACT | 37 | 2 | 5.41 |
| 22 | OTHER SLL CRIMES | 42357 | 33500 | 79.09 |
| **TOTAL COGNIZABLE CRIMES UNDER SLL** | | **127940** | **46012** | **35.96** |

**२.६.५** सन २०१० सालात महाराष्ट्र राज्यात दाखल गुन्ह्यांपैकी ९ शहरात परकीय नागरीक नोंदणी कायदा (१००%), अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा (७५.८२%), मादक औषधे व अंमली पदार्थाचा कायदा (८०.४८%), भारतीय पारपत्र कायदा (८६.९६%), बौद्धिक संपदा हक्क कायदा (६६.४७%), हुंडा प्रतिबंधक कायदा (२०%) व नागरी हक्क संरक्षण कायदा (८%) या गुन्हेशीर्षकातील दाखल गुन्हयांचा महत्वपूर्ण वाटा आहे.

**2.6.5** A Large number of cases under Registration Of Foreigners Act (100%), Immoral Traffic [prevention] Act (75.82%), N.D.P.S. Act (80.48%), Indian Passport Act (86.96%), Copyright Act (66.47%), Dowry Prohibition Act (20%), and Protection Of Civil Rights Act (8%) have been reported in the 9 cities, under S.L.L during 2010

**मोठया शहरांतील गुन्हेगारीचा कल**

**हत्यार अधिनियम व स्फोटक पदार्थ कायदा**

**२.६.६** सन २००९ पेक्षा २०१० मध्ये शस्त्रांसंबंधी कायदा अधिनियमाखाली ९ शहरांमध्ये दाखल झालेल्या गुन्हयांमध्ये (९.८४%) घट झाल्याचे आढळून येते. महाराष्ट्र राज्यात दाखल गुन्हयापैकी (६३.४८%) गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. नागपूर शहरामध्ये सर्वात जास्त (२९६) गुन्हयांची नोंद असून त्याखालोखाल मुंबई शहर (१९३) आणि पुणे शहर (६३) या शहरांचा क्रम लागतो.

**Crime pattern in Large Cities**

**Arms Act , Explosives & Explosive Substances Act**

**2.6.6** In the year 2010 there was a decrease under the Arms Act in the 9 cities by (9.84%) as compared to the year 2009. These 9 cities reported around (63.48%) of the total cases reported in the State in 2010. Nagpur (C) reported the highest (296) cases under Arms Act amongst the 9 cities followed by Mumbai (C) (193) and Pune (C) (63).

**स्फोटक पदार्थ कायदा**

**२.६.७** सन २०१० मध्ये स्फोटक पदार्थासंबंधीच्या कायद्यांतर्गत राज्यात ५१ गुन्हयांची नोंद असून त्यापैकी २ गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल आहेत. हे प्रमाण राज्याचे एकूण दाखल गुन्हयांच्या ३.९२% इतके आहे.

**मादक पदार्थांसबंधीचे गुन्हे**

**२.६.८** अंमली पदार्थ व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ प्रतिबंध कायद्याखाली ९ शहरांमध्ये सन २०१० मध्ये ८७० गुन्ह्यांची नोंद असून महाराष्ट्र राज्यात या कायद्याखाली दाखल गुन्ह्यांपैकी ८०.४८% गुन्हे शहरांत नोंद झालेले आहेत. सन २००९ सालात या कायद्याखाली दाखल झालेल्या गुन्ह्यांशी तुलना करता सन २०१० सालात ३०.१८% ने घट झाल्याचे दिसून येते.

**२.६.९** मुंबई शहरात सर्वात जास्त ६५७ गुन्हे (७५.५२%) सन २०१० मध्ये दाखल आहेत. त्याचप्रमाणे या कायद्याखाली महाराष्ट्र राज्यात एकूण दाखल गुन्हयांपैकी ६०.७८% गुन्हे एकट्या मुंबई शहरात नोंद झालेले आहेत. पुणे शहर (९२), नागपूर शहर (४८), ठाणे शहर (४१), अमरावती शहर (१९) तसेच नाशिक शहर (६), नवी मुंबई (४), औरंगाबाद शहर (३) व सोलापूर शहर (०) गुन्हयांची नोंद सन २०१० सालात झालेली आहे.

**जुगार कायदा विषयक गुन्हे**

**२.६.१०** सन २०१० सालात राज्यात जुगारसंबंधी कायद्यांतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यांपैकी १६.४९% गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. या कायद्याखाली झालेल्या कारवाईमध्ये सन २००९ पेक्षा सन २०१० मध्ये १.५९% ने घट झालेली आहे. नागपूर शहर मध्ये सर्वात जास्त (८१८) गुन्ह्यांची नोंद असून ९ शहरांत या कायद्याखाली दाखल गुन्ह्यांपैकी ४१.३८% गुन्हे नागपूर शहरात नोंदले गेले आहेत. त्या खालोखाल ठाणे शहर (२३९), अमरावती शहर (२३२), पुणे शहर (२१२), सोलापूर शहर (१९८), मुंबई शहर (१२८) आणि नाशिक शहर (७६) या शहरांत या गुन्हयांची नोंद झालेली आहे.

**दारूबंदी कायद्याखालील गुन्हे**

**२.६.११** राज्यात या कायद्याखाली दाखल झालेल्या गुन्हयांपैकी ११.१८% गुन्हे ९ शहरांमध्ये नोंद झालेले आहेत. नागपूर शहर सर्वात जास्त (२६५१) गुन्हयांची नोंद झाली असून ९ शहरांत दाखल गुन्हयांपैकी ३४.९ % गुन्हे नागपूर शहरात नोंद आहेत. त्यापाठोपाठ सोलापूर शहर (१२५०) १६.४६%, पुणे शहर (११८०) १५.५४%, ठाणे शहर (८७३) ११.४९%, आणि अमरावती शहर (७५५) ९.९४ % या शहरांमध्ये गुन्हे नोंद झालेले आहेत.

**अनैतिक व्यापार विषयक गुन्हे**

**२.६.१२** अनैतिक व्यापार (प्रतिबंध) कायदा ही प्रामुख्याने नागरी भागातील विशिष्ट अशी गुन्हेगारी आहे. राज्यात या कायद्याखाली दाखल गुन्हयांपैकी ७५.८२% वाटा या ९ शहरांचा आहे. ९ शहरामध्ये दाखल गुन्ह्यांपैकी ५३.०२% वाटा (१२३) मुंबई शहराचा आहे .

**Explosives & Explosive Substances Act.**

**2.6.7** All together 51 Cases were reported in the State under Explosives & Explosive Substances Act out of which 2 cases were reported under this head in 9 cities, which contribute 3.92% of the total cases registered in the State.

**Drug Offences**

**2.6.8** Under N.D.P.S. Act 870 cases were reported in 9 cities which accounted for 80.48% of total State crime during 2010. The rate of incidence of such cases reported in the cities decreased by 30.18% in 2010 as compared to 2009.

**2.6.9** Number of cases reported under this head in different 9 Cities, Mumbai (C) reported the most cases 657 (75.52%). Out of total crimes in the State 60.78% crime were reported in Mumbai (C) alone during 2010 followed by Pune (C) (92), Nagpur (C) (48), Thane (C) (41), Amravati (C) (19), Nasik (C) (6), Navi Mumbai (C) (4), A'bad (C) (3) & Solapur (C) (0) under this Act in 2010.

**Cases under Gambling Act.**

**2.6.10** The number of offences reported under the Gambling Act in 2010 in the 9 cities accounted for 16.49% of all such offences reported statewide. The incidence of such cases in 2010 decreased by 1.59% over 2009. Nagpur (C) reported the highest cases (818) 41.38% out of cases reported in all 9 cities, followed by Thane (C) (239) , Amravati (C) (232) , Pune (C) (212) , Solapur (C) (198) , Mumbai (C) (128) and Nasik (C) (76).

**Prohibition Act**

**2.6.11** The number of offences reported under Prohibition Act in the 9 cities in 2010 were 11.18% of Statewide incidence. Nagpur (C) (2651) reported the highest cases (34.9%) of Prohibition Act followed by Solapur (C) (1250) 16.46%, Pune (C) (1180) 15.54%, Thane (C) (873) 11.49% and Amravati (C) (755) 9.94%.

**Immoral Traffic Offences**

**2.6.12** Immoral Traffic [prevention] Act is a predominantly urban phenomenon. The 9 Cities contributed 75.82% to the State share. Out of total offences registered in 9 cities, 53.02% offences were registered in Mumbai (C) alone (123).

**परदेशी नागरिक नोंदणी व पारपत्र कायदा विषयक गुन्हे**

**२.६.१३** परकीय नागरीक नोंदणी कायद्यानुसार सन २०१० सालात राज्यात दाखल एकूण गुन्हयांपैकी १००% गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल झालेले आहेत. या सर्व १६ गुन्ह्यांपैकी एकटया पुणे शहरात ७ गुन्हे दाखल झालेले असून मुंबई शहरात ५ गुन्हे दाखल आहेत.

**२.६.१४** सन २०१० मध्ये भारतीय पारपत्र कायद्याखाली महाराष्ट्र राज्यात एकूण ६९ गुन्हयांची नोंद असून त्यापैकी (६०) ८६.९६% गुन्हे ९ शहरांमध्ये दाखल आहेत. पैकी ५२ गुन्ह्यांची नोंद नवी मुंबई शहरात झालेली आहे.

**स्त्रियांचे असभ्य प्रदर्शन प्रतिबंध कायदा**

**२.६.१५** या कायद्याखाली राज्यात एकही गुन्हा दाखल झालेला नाही.

**बौद्धिक संपदा हक्क कायदा**

**२.६.१६** या कायद्याखाली मूलतः नागरी भागामध्येच गुन्हे घडतात. सन २०१० सालात राज्यात दाखल गुन्ह्यांपैकी ६६.४७% गुन्हे ९ शहरांमध्ये नोंदले गेले आहेत. सर्वात जास्त गुन्हे मुंबई शहर (२१६), पुणे शहर (५२), ठाणे शहर (४९) व नवी मुंबई (४२) या शहरांमध्ये दाखल झालेले आहेत.

**वन अधिनियमाखालील गुन्हे**

**२.६.१७** राज्यात या कायद्याखाली ३७ गुन्हयांची नोंद झालेली असून पैकी फक्त २ गुन्हे शहरी विभागात दाखल आहेत.

**२.६.१८** ९ शहरांमध्ये विशेष व स्थानिक कायद्याखालील दाखल गुन्हयांची व राज्यात दाखल गुन्हयांची टक्केवारी खालील आलेख २.३ वरून दृष्टिक्षेपात येईल.

**Offences under Registration of Foreigners Act & Passport Act.**

**2.6.13** Cases registered under the Registration Of Foreigners Act in the 9 cities amounted to 100% of the total cases reported in the State during 2010. Out of 16 cases, 7 cases were reported in Pune (C) alone, followed by Mumbai (C) (5).

**2.6.14** In 2010, the share of offences under the Indian Passport Act in the 9 Cities was 60 i.e. 86.96% of the total cases reported in the State (69), Navi Mumbai (C) reported 52 out of these 60 cases.

**Indecent Representation of Women (Prohibition)**

**2.6.15** No case registered in the State under this Act.

**Copyright Act**

**2.6.16** Cases under Copyright Act predominantly take place in urban areas. The 9 cities contributed 66.47% of all such offences reported in the State during 2010. Highest number of cases under this Act were reported from the cities of Mumbai (C) (216), Pune (C) (52), Thane (C) (49) and Navi Mumbai (C) (42).

**Offences under the Forest Act**

**2.6.17** In all 37 cases were reported in the State under the Forest Act. The Cities accounted for 2 of these cases.

**2.6.18** The percentage share of offences registered under Special and Local Laws in large cities in the context of Statewide reported cases under these laws is shown in the following Chart No.2.3.

## आलेख क्र. २.३

## सन २०१० मधील ९ शहरांच्या विशेष व स्थानिक कायद्यांतर्गत गुन्ह्यांची टक्केवारी दर्शविणारा

## Chart No. 2.3

## Percentage share of 9 cities towards various SLL offences during -2010

